जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -७६६ दिनांक - २८/१०/२०२३**

पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर

## मुंढवा पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची ५२ वी कारवाई

पुणे पोलीस आयुक्तालयातील मुंढवा पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **फिरोज मोहंमद शेख,वय-२८ वर्षे,रा.लेन नं.५,होम नं.२२,म्हाडा कॉलनी,विमाननगर,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने त्याच्या साथीदारांसह मुंढवा, चंदननगर, विमानतळ पोलीस स्टेशनच्या हद्दीत लोखंडी कोयता, चाकू यासारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह खुनाचा प्रयत्न, सरकारी नोकरास आपखुषीने दुखापत करणे, सरकारी कामात अडथळा आणणे, विनयभंग, दंगा करणे, बेकायदा हत्यार बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ०४ गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये नागपूर मध्यवर्ती कारागृह,नागपुर येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.विष्णु ताम्हाणे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,मुंढवा पोलीस स्टेशन पुणे व श्री.ए.टी.खोबरे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा, पुणे शहर,श्री.राजु बहिरट,पोलीस उप निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर यांनी सदरची कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणा�या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यानंतरची एम.पी. डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही ५२ वी कारवाई असुन**,यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.